# 'टीसीएस आयटी विझ २०१७'
# नागपुरात १२ सप्टेंबरला

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

नागपूर : टाटा कंसलटन्सी सर्विसेस (टीसीएस)या आघाडीच्या आयटी सर्विसेस, कंसलटींग आणि बिजनेस सोल्युशन फर्मतर्फे 'टीसीएस आयटी विझ २०१७'च्या नागपूर एडिशनची घोषणा करण्यात आली असून, १२ सप्टेंबरला सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. वर्ग ८ ते वर्ग १२वीचे विद्यार्थी यात सहभागी होऊ शकतात. एका शाळेतून दोन विद्यार्थी असलेल्या एकापेक्षा अधिक चमूदेखील भाग घेऊ शकतात. यासाठी प्रवेश निःशुल्क ठेवण्यात आला आहे.

शाळांना आपल्या प्रवेशिका ९ सप्टेंबरपर्यंत किंवा त्याआधी प्रशांत कोपरकर, टीसीएस आयटी विझ समन्वयक, अग्रवाल हाऊस, बुराडे गल्ली, तेलीपुरा, सीताबर्डी, नागपूर येथे नोंदवायच्या आहेत. ऑनलाइन नोंदणीदेखील केली जाऊ शकते. या आयटी विझमध्ये आयटी क्षेत्रासबंधी विविध व्यक्ती, घडामोडी, उपकरणं इत्यादींवर प्रश्न विचारले जातील. 'टीसीएस आयटी विझ २०१७' भारतातील १२ ठिकाणी आयोजित केली जाणार आहे. यात अहमदाबाद, बंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदोर, कोची, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे या शहरांचा समावेश आहे. प्रादेशिक फेऱ्यांमधून पात्र झालेल्या चमूंमध्ये डिसेंबर महिन्यात होऊ घातलेल्या राष्ट्रीय अंतिम फेरीत मुंबई येथे सामना होईल.